## प्रकरण ३ रे.

## महाराष्ट्रातील विसाव्या शतकारंभीची सामाजिक, शैक्षणिक पार्श्वभूमी.


३.१ प्रस्तावना.

३.२ महाराष्ट्रातील विसाव्या शतकारंभीची सामाजिक परिस्थिती.

३.३ महाराष्ट्रातील शतकारंभीची शैक्षणिक परिस्थिती.

३.४ महाराष्ट्रातील विसाव्या शतकारंभीच्या शिक्षण प्रसारकांचे कार्य.

१] महर्षि धोंडो केशव कर्वे [१८५८ ते १९६२ ]

२] राजर्षी छत्रपती शाहू महाराज [१८७४ ते १९२२]

३] महर्षि विठ्ठल रामजी शिंदे [१८७३ ते १९४०]

४] कर्मवीर भाऊराव पाटील [१८८७ ते १९५९]

५] गुरुवर्य बापूरावजी जगनाथ [ १८८८ ते १९७८]

६] दलितांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर [१८९१ ते १९५६ ]

७] डॉ. पंजाबराव देशमुख [ १८९८ ते १९६५ ]

८] बाबूरावजी घोलप [ १९०४ ते १९८२ ]

३.५ समारोप.

संदर्भ


::::::::

## ३.१ प्रस्तावना -

प्रकरण २ मध्ये शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेतला आहे. बापूजींच्या कार्याचे महत्व तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ठरणार आहे. म्हणून त्यावेळची म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरूवातीची महाराष्ट्रातील सामाजिक शैक्षणिक परिस्थितीचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## ३.२ महाराष्ट्रातील विसाव्या शतकारंभीची सामाजिक परिस्थिती.

### जातीव्यवस्था -

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाज जीवनावर वर्ण व्यवस्थेचा फार मोठा पगडा होता. समाजाची विभागणी अनेक जातीमध्ये झाली होती. जाती जातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ अशा प्रकारचा भेदभाव करण्यांत आल्यामुळे प्रत्येक जातीला विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते. जातीव्यवस्थेची बंधने अतिशय कडक होती. व्यक्तीचा व्यवसाय तिच्या जातीवरून ठरत असे. जुन्या काळातील ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र हे चातुर्वर्ण चालूच होते. या शिवाय ब्राम्हण, मराठा, लिंगायत, सोनार, गुजर मारवाडी, अशा पुढारलेल्या जातीचा एक वर्ग स्वत:ला सर्वापेक्षा श्रेष्ठ समजत होता. तेली, कासार, कुंभार , लोहार, सुतार, अशा धंद्यावरून झालेल्या जातीचा एक वर्ग होता.

महार, मांग, चांभार, ढोर, कोळी, अशा मागासलेल्या जातीचा एक वर्ग होता. **पारधी** , भिल्ल, लमाण, कांजारभाट, गारूडी या सारख्या गुन्हेगार भटक्या जातीचा एक वेगळाच वर्ग मानला जात होता. अशी जाती व्यवस्थेची सामाजिक उतरंड तयार झाली होती.

पेशवाई पासून चालत आलेले ब्राम्हणाचे वर्चस्व अद्याप टिकून होते. शिक्षणाचा अधिकार फक्त ब्राम्हणानांच होता. जातीय वर्चस्वामुळे ब्राम्हण

इतर जातींना कमी दर्जाचे लेखीत होते. त्यावेळी अस्पृशांची अवस्था भयानक खालावलेली होती. तिचे वर्णन माधवराव बागल यांनी "सामाजिक विचार मंथन" या ग्रंथात असे केले आहे की,

> " सवर्ण जातीतील लोकांना अस्पृश्यांच्या स्पर्शानेही विटाळ होत असे. अस्पृश्यांना मंदीर प्रवेशासाठी मनाई होती. विहीर, तळी, घाट यांचा वापर अस्पृश्यांना करता येत नसे." १.

अस्पृश्यांची अवस्था गुलामगिरीहूनही वाईट बनली होती. धार्मिक विधी, पूजा-अर्चा करण्याचे अधिकार ब्राम्हणालाच होते. त्यामुळे बहुजन समाजाची पिळवणूक होत असे. सामाजिक क्षेत्रातील उच्च पदे फक्त ब्राम्हण लोकानांच मिळत . त्यामुळे जातीय विषमतेचा दर्प वाढतच होता.

कुटुंब व्यवस्था -

विसाव्या शतकारंभीची कुटुंब व्यवस्था पुरूष प्रधान होती. तसेच त्यावेळचे कौटुंबिक जीवन आजच्यापेक्षा अधिक शिस्तबध्द साचेबध्द आणि खडतर होते. कुटुंबातील कर्त्या पुरूषाने जे नियम घालून दिलेले असत त्यापलिकडे जाण्याचा अधिकार कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला नव्हता. त्यावेळच्या कुटुंब व्यवस्थे संबधी रा. तु. पाटील आपल्या " विसाव्या शतकारंभीचा ग्रामीण महाराष्ट्र" या पुस्तकात असे लिहतात की,

> " तत्कालीन कुटुंब म्हणजे छोटेसे स्वावलंबी, स्वयंपूर्ण राज्यच होते. मोठा चौसोपीवाडा हे त्याचे कार्यालय असे, कुटुंबातील प्रमुखाला कारभारी म्हणत. कुटुंबातील सर्व लोकात एकमेकाबद्दल प्रेम, आपुलकी व आदराची भावना होती. " २.

त्यावेळी कुटुंबाचे जीवन शेतीवर अवलंबून असे. त्यामुळे एकमेकांच्या सहकार्याने श्रमविभागणी तत्वावर एकत्र कष्ट करून कुटुंबाची वाढवा व्हावी ही इर्षा त्यांच्यात असे. ऐकमेकाविषयी जिव्हाळा, त्यागाची भावना त्यांच्यामध्ये होती. एकत्र कुटुंब पध्दतीमुळे त्यांच्या गरजा कमी प्रमाणात असत.

8239
A.

स्त्री जीवन -

पुरूष प्रधान कुटूंबव्यवस्थेमुळे स्त्रीयांचा दर्जा कमी प्रतीचा होता. स्त्रीयांची सर्वत्र कुचंबणा होत होती. स्त्रीया पुरूषापेक्षा दुबळ्या समजल्या जात. मिळेल ते खावे पडेल ते काम करावे अशी स्त्रीयांची अवस्था होती. मुलीला सासरी खूप त्रास सोसावा लागे. मुलींना शाळेत पाठवणे निषिध्द मानले जाई, मुलगी १२ वर्षाची झाली की लग्न लावून टाकीत. बाल विवाह पध्दती सर्वत्र चालू होती. स्त्रीयांना पुर्नविवाहास वाव नव्हता. रखेली ठेवण्याची पध्दती, नायकीनी देवदासी, अशा निरनिराळ्या अवस्थेत स्त्रीयांना वाईट जीवन जगावे लागे. सुखवस्तू लोक आपल्या पदरी कुणबीणी बाळगत असत. या कुणबीणींचा विक्रय होत असे. विधवा स्त्रीयांना पतीच्या निधनांनंतर खडतर जीवन कंठावे लागत असे व्रत वैकल्ये करून परमार्थ साधनेत संपूर्ण आयुष्य घालविण्याचे विधवा स्त्रीयांवर बंधन होते. स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यामुळे स्त्रीयांना सामाजिक दर्जा अजिबातच नव्हता. एकंदरीत स्त्रीयांची स्थिती अतिशय दयनीय होती.

दुष्ट चालीरिती व अंधश्रध्दा -

विसाव्या शतकारंभी समाजाची अधोगती झालेली होती. समाजदुष्ट चालीरितींनी पोखरला होता. तत्कालीन प्रथेसंबंधी प्राचार्य रा.ना. गायकवाड आपल्या"महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास"या पुस्तकात असे लिहतात की,

> " त्यावेळी समाजात बालविवाह पध्दती, सती जाण्याची पध्दती विधवांचे केस कापणे, नरबली, पुर्नविवाह पध्दती, देवदेवतापुढे बकऱ्याचे बळी देण्याची पध्दती यासारख्या अनिष्ठप्रथा रूढ होत्या. " ३.

अंधश्रध्दा व भोळसट समजूतीवर समाजाचा कमालीचा विश्वास होता. हिंदू धर्मात मूर्ती पूजेला मान्यता असल्याने सर्व सामान्य लोक देवदेवतांची उपासना करीत. भावीक लोक अनेक प्रकारची वृत्ते करीत. विविध देव देवतांच्या

मंदिराची संख्या भरपूर होती. अंधश्रध्देमुळे भतबाधा, चेटूक, ग्रहण, मुहूर्त, अपशकून यासारख्या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले होते. नवस फेडण्यास पशुबळी दिला जात असे. एकंदरीत अंधश्रध्दा, दुष्ट चालीरिती, जातीभेद यांनी समाजपूर्णपणे ग्रासला होता. अशा अवस्थेत ख्रिस्ती मिशनऱ्यानी ख्रिश्चन धर्माच्या प्रसारास सुरवात केली. प्राध्यापक डॉ. जयसिंगराव पवार ख्रिस्ती धर्म प्रसाराबद्दल आपले लक्ष्य वेधतात.

> " भारतातील कांहीसुशिक्षीत लोकांना ख्रिस्ती धर्मातील उच्च व उदात्त तत्वांची महती पटली. विशेषत: समता, या ख्रिस्ती धर्मातील तत्वाने भारतीय विद्वानांवर मोठीच मोहिनी घातली "४

महाराष्ट्रातील सुशिक्षीतांचे हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरिती व खुल्चट आचार विचार याकडे लक्ष्य वेधले. टिळक, आगरकर, गोखले, भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, चिपळूणकर, पंडीता रमाबाई इत्यादी नवशिक्षतानी समाजातील अंधश्रध्दा व दुष्ट चालीरितीवर हल्ले चढविले. नव विचाराना चालना दिली. त्यामुळे सामाजिक जीवनात परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली.

धार्मिक जीवन -
-----------

समाजात धर्माला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. महाराष्ट्रात निरनिराळ्या जाती धर्माचे लोक एकत्र नांदत असत. बहुसंख्य लोक हिंदू धर्मीय होते. या काळात हिंदू धर्माला अवकळा प्राप्त झाली होती. धर्माच्या नावाखाली सर्वत्र अधर्म माजला होता. धार्मिक विधीमध्ये कर्मकांडाचे प्रस्थ वाढले होते. सर्वत्र धार्मिकतेचे देव्हारे माजविण्यात आले होते. हिंदू धर्मात मूर्तीपूजेला मान्यता प्राप्त झाली होती. प्रत्येक जातीच्या व धर्माच्या पारंपारीक रुढी व चालीरिती, रिवाज निरनिराळे होते. पारंपारिक धार्मिक विचारामुळे एकंदर समाजाची अधोगतीच होत होत होती. धार्मिक विविधतेचा इंग्रजानी फायदा करुन घेतला आणि समाजातील एकजिनसीपणा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दिशाहीन निष्क्रीय समाजाला गुलाम बनविण्याचे धोरण अवलंबिले. अशा निष्क्रीय समाजाला जागृत करण्याचे कार्य अनेक समाज सुधारक व संस्थानी केले. त्या संदर्भात डॉ. जयसिंगराव पवार आपल्या -

"हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास" या ग्रंथात म्हणतात

"विसाव्या शतकाच्या सुरवातीस आर्यसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज इत्यादी सामाजिक संस्थानी समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला." ५.

## ३.३ महाराष्ट्रातील विसाव्या शतकातील शैक्षणिक परिस्थिती -

विसाव्या शतकाच्या प्रारंभी प्राथमिक शाळा तालुक्यातील चार पाच मोठ्या गावांत असत. त्यामध्ये बहुधा ब्राम्हणांची मुले शिकत होती. खेडयातील शाळा देवळात भरत असत. शिक्षकाचे काम ब्राम्हणांकडे होते. कांही ठिकाणी ब्राम्हण गुरुजीच्या वाडयात ओसरीवरच शाळा भरत होती. शाळेत धुळपाटीचा उपयोग केला जात होता. त्यावेळी घोकंपट्टीवर जास्त भर देत होते. सातव्या इयत्तेसाठी तोंडी परीक्षा व मॅट्रीकच्या परीक्षेसाठी चार जिल्हयासाठी एकच केंद्र होते. माध्यमिक शिक्षणाची फार गैरसोय होती. जिल्हयाच्या ठिकाणीच एखादे हायस्कूल होते. उच्च शिक्षणाची सोय फक्त पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, या सारख्या ठिकाणीच होती. इंग्रजी शिक्षण घेतल्यावर उच्च पदस्थ नोक-या मिळत. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाला फार महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. खेडयात पत्र वाचावयाचे झाले तर, भटजीबुवानाच पाचारण केले जात होते. एकंदरीत तत्कालीन शिक्षणाचा पाया अस्थिर झाला होता. समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. त्याशिवाय समाजाची सुधारणा होणार नाही. असे समाज सुधारकांना वाटू लागले त्यावेळच्या शैक्षणिक स्थितीचे वर्णन डॉ. एस्. एस्. भोसले यांनी आपल्या " महाराष्ट्राचे शिक्षण आणि परंपरा या ग्रंथात पुढील प्रमाणे केले आहे.

> " शिक्षणाच्या सर्व अगोपांगाचा पुर्नविचार होण्याची गरज होती. अशा वेळी समाज सुधारकांनी समाजसुधारणेचे एक माध्यम म्हणून शिक्षण प्रसारावर आपले लक्ष्य केंद्रित केले. "६

महाराष्ट्रातील बहुजन समाजाची उन्नती करावयाची असेल तर प्रथम

सामान्य जनतेला शिक्षण मिळाले पाहिजे. त्यादृष्टीने समाजसुधारकांनी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी इंग्रज सरकारशी झगडण्यास सुरुवात केली. परिणाम म्हणून इंग्रज सरकारने भारतात इंग्रजी शिक्षण देण्यास सुरुवात केली. भारतीय जनतेला साम्राज्य विस्तारासाठी शिक्षीत करावयाचे व त्यातून कारकून निर्माण करावयाचे असा इंग्रजांचा शिक्षणाबाबतचा दृष्टीकोण होता. भारतात चालू असलेली पारंपारिक शिक्षण पध्दती ब्रिटीशांनी बंद केली. पाश्चात्य शिक्षण पध्दतीच्या धर्तीवर शिक्षण देण्यास सुरुवात केली. नवीन शिक्षण पध्दतीमुळे प्राथमिक शिक्षण आठ वर्षांचे व माध्यमिक शिक्षण सात वर्षांचे झाले. सन १९२१ पर्यंत अध्यापनाचे माध्यम इंग्रजीच होते.

पाश्चात्य शिक्षण पध्दतीमुळे पाश्चात्य साहित्य, संस्कृती, विज्ञान यांचा परिचय होवू लागला. त्यामुळे भारतीय तरुणामध्ये नवीन विचार निर्माण होवू लागले व इंग्रजी शिक्षणास उत्तेजन मिळाले. याच वेळी इंग्रजी शिक्षणाने प्रेरित होवून कांही शिक्षणप्रेमी व्यक्ती पुढे आल्या व त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले.

## ३.४ महाराष्ट्रातील विसाव्या शतकारंभीच्या शिक्षण प्रसारकांचे कार्य -

### १] महर्षि धोंडो केशव कर्वे - [ १८५८ ते १९६२ ]

प्राध्यापकाच्या नोकरीने कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याची सुरवात झाली. नोकरी करीत असतानांच त्यांनी सन १८९९ मध्ये अनाथ बालिकाश्रम ची स्थापना केली. मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सन १९०७ मध्ये हिंगणे येथे महिला विद्यालयाची स्थापना केली. स्त्रियांना स्वावलंबी बनण्याचा अभ्यासक्रम कर्वे यांनी या विद्यालयात ठेवला होता. स्त्री शिक्षण प्रसाराचे कार्य निस्वार्थीपणाने व त्यागी वृत्तीने करणारे समाज सेवक निर्माण व्हावेत म्हणून कर्वे यांनी सन १९१० मध्ये "निष्काम कर्ममठ" या संस्थेची स्थापना केली.

महिलांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी सन १९१६ मध्ये महिला विद्यापीठाची स्थापना केली. तसेच ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी सन १९३६ मध्ये " महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ स्थापले. विधवा विवाहास चालना मिळावी म्हणून सन १८९३ मध्ये " विधवा विवाहोत्तेजक" मंडळाची स्थापना केली. त्यासाठी त्यानी स्वत: एका विधवा स्त्रीशी विवाह करुन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. सन १९४४ मध्ये जातीभेद व अस्पृश्यता निर्मूलनासाठी "समता संघाची" स्थापना केली.

२] राजर्षी छत्रपती शाहू महाराज - [१८७४ ते १९२२]

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्यक्रमाला अग्रक्रम दिला होता. सन १९०१ मध्ये निर-निराळ्या जातीच्या विद्यार्थ्यांच्या राहाण्या जेवण्याच्या सोयीसाठी मराठा बोर्डिंग हाउस स्थापन केले. कोल्हापूर पुणे, नागपूर, नाशिक, सातारा, सांगली, नगर इत्यादी शहरातील निरनिराळ्या जातीच्या वसतिगृहाना व शैक्षणिक संस्थाना आर्थिक मदत केली. गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या जाहिर केल्या. सन १९१३ मध्ये कोल्हापुरात गावकामगार पाटील मंडळीसाठी पाटीलशाळा सुरु केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा कायदा केला. जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी अनेक उपाय योजना केल्या. अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या दिल्या. अस्पृश्यांना सरकारी नोकरीत मानाच्या जागा दिल्या. मागास जातीतील सुशिक्षीतांना वकीलीच्या सनदा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्य जातीतील लोकांना हॉटेल, दुकाने काढण्यास प्रोत्साहन दिले. अस्पृश्य निर्मूलन परिषदा भरविल्या. तसेच सामान्य जनतेच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या. आपल्या राज्यासाठी शाहू महाराजांनी केलेल्या सुधारणा विषयी श्री धनंजय कीर आपल्या "राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतीकारक राजा" या ग्रंथात लिहतात.

" मजूरांना काम मिळावे व शेतक-यांचा फायदा व्हावा यासाठी महाराजांनी इस. स. १९१६ मध्ये "श्री शाहू मीलची" स्थापना केली. राधा नगरी धरणाची योजना राबविली, स्वस्त धान्य दुकाने सुरु केली. सन १९१२ मध्ये सहकारी सोसायटया सुरु केल्या, शेतक-यांची जनावरे सरकारी खर्चाने संभाळण्याची व्यवस्था केली. सन १९१७ मध्ये विधवा पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता दिली. "७. छत्रपती शाहू महाराजांनी -

अशी अनेक लोक उपयोगी कामे केली. त्याचबरोबर ख-या अर्थाने बहुजन समाज शिक्षणाची चळवळ यशस्वीपणे राबविली.

३] <u>महर्षि विठ्ठल रामजी शिंदे</u> [१८७३ ते १९४४ ]

प्रार्थना समाजाचे एक प्रचारक म्हणून शिंदे यांनी आपल्या सामाजिक, कार्याची सुरुवात केली. हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरिती, अंधश्रध्दा नष्ट होण्यासाठी त्यांनी अनेक शहरात धर्म परिषदा घेतल्या. त्यांनी अस्पृश्योध्दाराचे कार्य सुरु केल्यावर प्रथम स्वत: आपल्या कुटूंबियासह अस्पृश्य वस्तीत राहावयास गेले. अस्पृश्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे वर्णन भाई माधवराव बागल आपल्या " सामाजिक विचार मंथन " या पुस्तकात असे करतात की,

" महर्षि शिंदे यांनी तर अस्पृश्योद्धाराला आपले जीवनच वाहून घेतले होते. आण्णा साहेबांचे सर्वकुटूंबच अस्पृश्याच्या उत्कर्षासाठी काम करीत असे. त्यांची बहिण जनाक्का या स्वत: अहिल्याश्रमात स्वयपाकाचे काम करीत असत. सन १९०६ मध्ये अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी " डिप्रेस्ड क्लासेस मशिन" नावांची संस्था स्थापन केली. या मिशनची व्यवस्था सन १९२३ पासून अस्पृश्यांच्या कमिटीकडेच सोपविली. हरिजनासाठी मुंबई, ठाणे, मालवण, अकोला, भावनगर येथे वसतिगृहे काढली. "८.

शेतक-यांच्या स्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी इ.स. १९२३ मध्ये पुणे येथे शेतकरी परिषद घेतली. इस. १९२८ मध्ये अहिल्याश्रमाची स्थापना केली. सन १९३३ मध्ये " भारतीय अस्पृश्येतेचा प्रश्न" हा ग्रंथ लिहला. स्त्री शिक्षण प्रसारासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले.

४] <u>कर्मवीर भाऊराव पाटील</u> - [ १८८७ ते १९५९ ]

भाऊराव पाटील कोल्हापूर येथे शिकावयास असतांना शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला. सन १९१९ मध्ये त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सन १९२४ मध्ये त्यानी सातारा येथे " छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस" सुरु केले. बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी प्राथमिकशाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शिक्षक प्रशिक्षण विद्यालये व महाविद्यालये सुरु केली. तसेच ठिकठिकाणी वसतिगृहे सुरु केली. वसतिगृहाच्या माध्यमातून शिक्षण प्रसाराद्वारे समाज परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या वसतीगृह कार्यासंबंधी प्राचार्य रा. ज्ञा. गायकवाड आपल्या " महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास" या पुस्तकात लिहतात.

> " कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची सुरवात वसतिगृहापासून होते. खेडयापाडयातील गरीब मुले बोर्डिंगमध्ये एकत्र आणावयाची आणि त्यांना शिक्षण द्यावयाचे हे कर्मवीरांचे ध्येय होते. वसतिगृहामध्ये निरनिराळ्या जातीच्या मुलांना प्रवेश देवून त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे कर्मवीर आण्णा स्वत: जातीने लक्ष्य देत होते. स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठेची नवी पिढी घडविली जात होती. "९.

आपल्या शैक्षणिक शाखामधून " कमवा व शिका " ही योजना त्यांनी राबविली. जेथे शाळा तेथे बोर्डिंग अशी चळवळ उभी केली. विद्यार्थ्यांनी श्रम करण्यात कमीपणा मानू नये असा त्यांचा अट्टाहास होता. कर्मवीरांनी विविध शैक्षणिक स्तरावर व्यापक प्रमाणात केलेल्या कार्याविषयी प्राचार्य अ. दा. आतार आपल्या "थोर शैक्षणिक तत्वेवेत्ते" या पुस्तकात असे लिहतात की,

" सन १९५० पर्यंत संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांची संख्या ५७८ होती. ह्या शाळा सरकारने ताब्यात घेतल्यावर कर्मवीरांनी माध्यमिक शाळा उघडण्याची मोहिम हाती घेतली. सन १९५३ पर्यंत माध्यमिक शाळांची संख्या ४४ होती. सन १९७७ मध्ये ही संख्या ३१२ पर्यंत गेली. तसेच संस्थेने २६ महाविद्यालये व ८ प्रशिक्षण विद्यालये चालविली." १०.

आपल्या शिक्षण प्रसार कार्याद्वारे त्यानी सामाजिक समतेचा संदेश देण्यात संपूर्ण आयुष्य घालविले.

५] गुरूवर्य बाबूरावजी जगताप -[१८८८ ते १९७८]

फर्ग्युसन कॉलेज मध्ये शिकत असतानाच त्यांनी हायस्कूल मधील मुलासाठी स्वाध्याय वर्ग चालविले, तसेच खेडूताना शिक्षणाचे महत्त्व पटविणे इत्यादी कामे विद्यार्थी दशेतच केली. सन १९१८ मध्ये पुण्यातील शुक्रवार पेठेत बहुजन समाजासाठी शाळा सुरु केली. त्या शाळेचेच पुढे " शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी" या नावांत रूपांतर झाले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी व शैक्षणिक आदर्श निर्मितीसाठी सन १९२२ पासून " शिक्षक" नावाचे मासिक सुरु केले. कोल्हापूरच्या संस्थानाचे शिक्षणाधिकारी म्हणून काम करीत असतांना त्यांनी खेडयापाडयात शाळा काढण्याच्या धोरणावर भर दिला. करवीर वाचनमाला सुरु केली. तेथून निवृत्त झाल्यावर गारगोटी येथील मौनी विद्यापीठात साक्षरता मोहिम व लोक शिक्षणाचे कार्य हाती घेतले. सन १९६२ मध्ये पुण्याचे महापौर झाल्यावर "लोककल्याण" कार्यक्रम हाती घेतला. महापालिकेतर्फे गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या शिष्यवृत्या जाहीर केल्या. नागरी संघटनेच्या प्रचाराचे कार्य केले. डॉ. श. ग. सोमवंशी त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयी लिहतात.

" पुणे जिल्हयात बाबूराव जगताप यांचे माध्यमिक शिक्षण प्रसाराचे कार्य फार मोलाचे आहे. त्यांनी १२ माध्यमिक शाळा चालविल्या व उच्च शिक्षणासाठी ३ महाविद्यालये काढली. "११.

६] दलिताचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर [ १८९१-१९५६ ]

प्राध्यापकाच्या नोकरीने त्यानी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात केली. इसवीसन १९२० मध्ये "मूकनायक" नावाचे पाक्षिक सुरु केले. त्यामधून त्यांनी आपल्या जातबांधवास त्यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्यास उत्तेजन दिले. अस्पृश्यासाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्याची माहिती देताना प्राध्यापक विलास पाटील लिहतात.

> " बाबासाहेबांनी २० मार्च १९२० रोजी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला.... २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती जाळली. मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहासाठी त्यांनी नाशिकच्या काळाराम मंदिराची निवड केली. २ मार्च १९३० रोजी हा सत्याग्रह झाला.... सन १९३२ मध्ये इंग्लडचे प्रतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांचेकडून अस्पृशासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करून घेतली. "२.

बाबासाहेबांनी दलित समाजाच्या शिक्षण प्रसारावर अधिक भर दिला. त्यासाठी त्यांनी सन १९२८ रोजी " बहिष्कृत हितकारीणी सभा" या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत त्यांनी दलित समाजातील तरुण प्रौढासाठी रात्रीच्या शाळा चालविल्या. हरीजनासाठी ठिक-ठिकाणी वाचनालये सुरु केली. दलित विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वसतिगृहे सुरु केली. इ.स. १९४६ मध्ये " पिपल्स एज्युकेशन सोसायटीची" स्थापना केली. या संस्थेमार्फत, मुंबई, औरंगाबाद पुणे, महाड येथे महाविद्यालये सुरु केली. हरिजनांच्या उच्च शिक्षणाची सोय करून त्यांच्यातील " माणूस" जागा केला. भारताची घंटना तयार करण्याची महत्त्वाची कामगीरी त्यांनी बजावली.

७] डॉ. पंजाबराव देशमुख - [ १८९८ ते १९६५ ]

बहुजन समाजाच्या उध्दारासाठी शिक्षणाचा प्रसार करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. इसवी सन १९३६ मध्ये त्यानी अमरावती

येथे " श्रध्दानंद छात्रालय" उघडून आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात केली. अमरावती जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यावर प्राथमिक शिक्षण सर्वासाठी सक्तीचे केले. सन १९३० मध्ये प्रांतिक सरकारात शिक्षणमंत्री असतांना गरीब विद्यार्थ्यांसाठी अनेक प्रकारच्या सोयी सवलती उपलब्ध करुन दिल्या. इ.स. १९३२ मध्ये अमरावती येथे "श्री शिवाजी शिक्षण" संस्थेची स्थापना केली या संस्थेच्या वतीने विदर्भात अनेक शाळा, महाविद्यालये व वसतिगृहे सुरु केली. प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडविल्या जाव्यात म्हणून त्यानी "भारतीय, प्राथमिक शिक्षक संघ" या संघटनेची स्थापना केली. त्यांनी समाजातील रुढी, प्रथा, परंपरेला व जाती भेदाला प्रखर विरोध केला. त्याची कृती म्हणून अमरावतीचे अंबादेवी मंदिर अस्पृश्याच्या प्रवेशासाठी खुले केले. भारतीय मागास जाति संघाची इ.स. १९२६ मध्ये त्यांनी स्थापना केली. इ.स. १९२७ मध्ये शेतकरी वर्गाची स्थिती सुधारावी म्हणून "शेतकरी संघाची" स्थापना त्यांनी केली. शेतक-याच्या प्रगतीसाठी " महाराष्ट्र केसरी" हे वृत्तपत्र सुरु केले इ.स. १९५२ मध्ये केंद्रिय कृषी मंत्री झाल्यावर शेतक-यांच्या हितासाठी अनेक योजना राबविल्या. या संदर्भात डॉ. काटीकर " महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास" या पुस्तकात लिहतात.

> पंजाबरावानी शेतक-यांच्या समस्याची सोडवणूक करण्यसाठी व त्याना मार्गदर्शन करण्यासाठी सन १९५५ मध्ये "भारत कृषक" समाजाची स्थापना केली. शेतक-याना खते बी-बीयाणे मिळण्यासाठी सवलती जाहिर केल्या, दिल्लीयेथे इ.स. १९६० मध्ये " जागतिक कृषक प्रदर्शन" ही आयोजित केले होते.."१३.

८] <u>बाबूरावजी घोलप - [ १९०४ ते १९८२ ]</u>

पुणे जिल्हा लोकल बोर्डाचा चीफ ऑफिसर म्हणून काम करीत असतांना त्यांचा ग्रामीण भागाशी खुप जवळाचा संबंध आला. त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करावा या उद्देशाने सन १९४१ मध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची स्थापना केली. त्यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती देताना डॉ. शं.ग.सोमवंशी लिहतात.

> पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने ३७९ व्हालंटरी शाळा चालविल्या. त्यांनी सन १९५६ मध्ये नरसापूर [ता. भोर] येथे माध्यमिक विद्यालय सुरु केले. सन १९७० पर्यंत त्यांच्या माध्यमिक शिक्षण प्रसार कार्याचा विस्तार वाढतच गेला. त्यांच्या माध्यमिक विद्यालयाची संख्या ४५ झाली. तसेच ओतूर, भोर, हडपसर येथे महाविद्यालये सुरु केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी सहा वसतिगृहे चालविली. "१४.

पुणे जिल्हयात शिक्षण प्रसार कार्यात बाबूरावजींचा सिंहाचा वाटा आहे. वसतिगृहाच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद निर्मूलनासाठी प्रयत्न केले.

## ३.५ समारोप -

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर जातीव्यवस्थेचा पगडा होता. जातीजातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव करण्यात आला होता. अंधश्रध्दा , रुढी, अज्ञान यानी समाज ग्रासला होता. शिक्षणाकडे सामान्य जनतेचे दुर्लक्ष होते इंग्रजी राजवटीमुळे जनतेची आर्थिक पिळवणूक होत गेली. महाराष्ट्रातील ही सामाजिक परिस्थिती बदलावी, बहुजन समाजाच्या सर्व थरातील स्त्री पुरूषांना शिक्षण मिळावे म्हणून महर्षिकर्वे, वि. रा. शिंदे, शाहू महाराज, भाऊराव पाटील, बाबुराव जगताप, डॉ. आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी शिक्षण प्रसारकानी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. त्याचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतला आहे. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे त्यापैकी एक शिक्षण प्रसारक होते. त्यांचे शैक्षणिक कार्य या पार्श्वभूमीवर महत्वाचे आहे. ते कार्य पुढील प्रकरणात दिले आहे.

::::::::::

३.६ संदर्भ -


१] माधवराव बागल : सामाजिक विचार मंथन
औरंगाबाद, आनंद प्रकाशन, १९८१. पृष्ठ क्र. ३२.

२] रा. तु. पाटील : विसाव्या शतकारंभीचा ग्रामीण महाराष्ट्र
तडसर [सांगली], परखड प्रकाशन, १९८७. पृष्ठ क्र. ११.

३] रा. ज्ञा. गायकवाड : महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९७८ पृष्ठ क्र. ९

४] जयसिंगराव पवार : हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.
मुंबई, सी. जमनादास आणि कंपनी, १९८८. पृष्ठ क्र. ५०

५] जयसिंगराव पवार : तत्रैव पृष्ठ क्र. ७५

६] एस. एस. भोसले : महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा.
कोल्हापूर, बापूजी साळुंखे षष्ठाब्दपूर्ती समिती, १९८०, पृष्ठ क्र. ६७३.

७] धनंजय कीर : राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतीकारक राजा.
मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९७९, पृष्ठ क्र. ३११.

८] माधवराव बागल : उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र. ४२.

९] रा. ज्ञा. गायकवाड : उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र. ६३.

१०] अ. दा. आत्तार : थोर शैक्षणिक तत्ववेत्ते.
सातारा, राविल पब्लिकेशन, १९७७. पृष्ठ क्र. १०

११] श. ग. सोमवंशी : महाराष्ट्रातील थोर शिक्षण महर्षि व समाजसेवक
पुणे, हायवे पब्लिकेशन, १९८६ पृष्ठ क्र. १०१.

१२] विलास पाटील : महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास
कोल्हापूर अजब पुस्तकालय, १९८६, पृष्ठ क्र. ८

१३] ब. अ. कारटीकर : महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९७८. पृ. क्र. ६९

१४] श. ग. सोमवंशी : उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्रमांक १५३.